दैनिक

# अदिती एक्सप्रेस

दि. २१ फेब्रुवारी २०२६
शनिवार
वर्ष ४ थे
अंक १०८
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे   उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**


### आजचे पंचाग

- दिनांक : २१ फेब्रुवारी २०२६
- वार : शनिवार
- माह (अमावस्यांत) : फाल्गुन
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : वसंत
- आयन : उत्तरायण
- पक्ष : शुक्ल पक्ष
- तिथी : तृतीया तिथी (दुपारी ०२:३८ पर्यंत) त्यानंतर चतुर्थी तिथी
- नक्षत्र : उत्तराभाद्रपदा नक्षत्र (रात्री ०८:०७ पर्यंत) त्यानंतर रेवती नक्षत्र
- योग : साध्य योग (सायंकाळी ०६:२२ पर्यंत) त्यानंतर शुभ योग
- करण : गराजा करण (दुपारी ०२:३८ पर्यंत) त्यानंतर वाणीजा करण
- चंद्र राशी : मीन राशी
- सूर्य राशी : कुंभ राशी
- अशुभ मुहुर्त:
- राहु काळ : सकाळी ११:२६ ते दुपारी १२:५२
- शुभ मुहुर्त:
- अभिजित : दुपारी १२:२९ ते दुपारी ०१:१५ पर्यंत
- सूर्योदय : सकाळी ०७:०५
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३९
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

## एआय समिटमध्ये महाराष्ट्राचा डंका

### कृषी विकासासाठी 'महाग्री एआय' ठरणार गेमचेंजर -मुख्यमंत्री फडणवीस

नवी दिल्ली : कृषी क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. आर्टीफिशीअल इंटेलिजन्सचा वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादीत न राहता ती मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचण्याची गरजही मुख्यमंत्र्यांनी प्रतिपादित केली.



नवी दिल्लीतील भारत मंडपम् येथे सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट -२०२६ मधील 'एआय इन अँग्रिकल्चर' या विषयावरील चर्चासत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मंत्री ड. आशिष शेलार, मंत्री नितेश राणे यांची उपस्थिती होती. या चर्चासत्रात मुख्य सचिव राजेशकुमार अगरवाल, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव देवेश चतुर्वेदी, कृषि सचिव विकासचंद्र रस्तोगी, एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामीनाथन, जागतिक बँकेच्या दक्षिण आशिया विभागाचे उपाध्यक्ष जोहॅन्स झुट, एकस्टेप फाउंडेशनचे सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शंकर मरुवाडा सहभागी झाले होते. नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी भारत सरकार, जागतिक संशोधन संस्था, गुंतवणूकदार यांच्याशी महाराष्ट्र सरकार सहकार्य करण्यासाठी तयार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सध्या जगभरात शेतीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षिततेवर ताण आला आहे. अनिश्चित वातावरण, घसरणारी पाणी पातळी, जमिनीचा खालावणारा दर्जा, पुरवठा साखळीतील अडथळे आणि जागतिक मार्केटमधील अनिश्चितता यांचा या आव्हानांमध्ये समावेश आहे. अशा परिस्थितीत आर्टीफिशीअल इंटेलिजन्स महत्वाची भूमिका पार पाडू शकते, असे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, जगातील अनेक देशांसाठी कृषी विषय केवळ आर्थिक विषयाशी निगडीत नाही. कृषी विषय अन्न सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता, आर्थिक स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे.

**(पान २ वर)**

## करार करा, अन्यथा परिणाम गंभीर होतील

### डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला स्पष्ट धमकी

नवी दिल्ली : अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव सतत वाढत चालला आहे. अमेरिकेची विमानवाहू नौका इराणच्या दिशेने सरकत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला करार करावाच लागेल. अन्यथा परिणाम गंभीर होतील असा इराणला थेट इशारा दिला आहे.



इराण संपूर्ण प्रदेशाच्या स्थैर्याला धोका निर्माण करू शकत नाही:

'बोर्ड ऑफ पीस' कार्यक्रमात बोलताना ट्रम्प म्हणाले की, इराणने आता आमच्यासोबत आम्ही तयार करत असलेल्या मार्गावर यावे. त्यांनी साथ दिली तर उत्तमच; पण साथ दिली नाही तरीही आम्ही पुढे जाऊ. मात्र तो मार्ग पूर्णपणे वेगळा असेल. त्यांनी पुढे सांगितले की, इराण संपूर्ण प्रदेशाच्या स्थैर्याला धोका निर्माण करू शकत नाही. त्यांना करार करावाच लागेल. अन्यथा परिणाम गंभीर असतील, असा इशाराही त्यांनी दिला.

पुढील दहा दिवसांत परिस्थिती स्पष्ट होईल:

गुरुवारी तेहरानवर टीका करताना ट्रम्प म्हणाले, आपल्याला कदाचित हे एक पाऊल पुढे न्यायला लागेल, किंवा कदाचित नाही. कदाचित आपण कराराच्या दिशेने जात आहोत. पुढील दहा दिवसांत परिस्थिती स्पष्ट होईल.

ट्रम्प यांनी पुन्हा एकदा ठामपणे सांगितले की, इराणकडे अण्वस्त्रे असू नयेत. इराणकडे अण्वस्त्रे असतील तर मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही, असे त्यांनी नमूद केले.

## 'बोर्ड ऑफ पीस'मध्ये चीन आणि रशियाचा समावेश ?

नवी दिल्ली : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'बोर्ड ऑफ पीस'च्या उद्घाटन बैठकीत चीन आणि रशियालाही सहभागी करून घेण्याची इच्छा व्यक्त केली. या बोर्डाची पहिली बैठक वॉशिंग्टन डीसी येथे झाली असून त्यात ४० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. ट्रम्प यांनी सांगितले की चीन आणि रशियाला निमंत्रण पाठवले आहे, मात्र त्यांनी



अद्याप सहभागी होण्याबाबत निर्णय घेतलेला नाही. त्यांनी पुढे नमूद केले की चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी त्यांचे अतिशय चांगले संबंध आहेत आणि एप्रिलमध्ये ते चीन दौर्यावर जाणार आहेत.

गाझा पट्टीच्या पुनर्बांधणीवर लक्ष: डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले की हा नवा शांती बोर्ड युनायटेड नेशन (यूएन) च्या कामकाजावर देखील लक्ष ठेवेल आणि ते योग्य पद्धतीने चालत असल्याची खात्री करेल. अमेरिका यूएनला आर्थिक मदत करून त्याची स्थिती अधिक मजबूत करणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. तसेच, या बोर्डाच्या कामासाठी अमेरिका १० अब्ज डॉलरची मदत देणार असल्याची घोषणा त्यांनी केली. सुरुवातीला हा बोर्ड गाझा पट्टीच्या पुनर्बांधणी आणि शांतता प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करणार आहे.

ट्रम्प यांच्या मते, या शांती बोर्डाचा उद्देश आंतरराष्ट्रीय संघर्ष निराकरण यंत्रणा अधिक बळकट करणे आणि जागतिक संकटांना सामोरे जाण्यासाठी सहकार्य वाढवणे हा आहे. **(पान २ वर)**

## भिवंडी पालिकेत बंडखोरी करणाऱ्यांवर कारवाई करणार : रवींद्र चव्हाण

मुंबई : भिवंडी महापालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत शुक्रवारी राजकीय नाट्य पाहायला मिळाले. भाजपचे बंडखोर नारायण चौधरी यांनी काँग्रेसच्या पाठिंब्यावर महापौरपद मिळवले. या निवडणुकीत भाजपचे सहा नगरसेवक फुटल्याचे स्पष्ट झाले असून, या बंडखोरांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिले आहेत.

भिवंडीत महापौर निवडीच्या प्रक्रियेत सुरुवातीपासूनच चुरस निर्माण झाली होती. भाजपने सुरुवातीला नारायण चौधरी यांच्या नावाचा विचार केला होता, मात्र प्रदेश पातळीवरील चर्चेनंतर आणि बदललेल्या राजकीय समीकरणांनंतर स्नेहा पाटील यांना अधिकृत उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. मात्र, चौधरी यांनी बंडखोरी करीत काँग्रेस आणि शरद पवार गटाचा पाठिंबा मिळवला.



महापौर पदाच्या निवडणुकीत त्यांना ४८ मते मिळाली. तर, भाजपच्या अधिकृत उमेदवार स्नेहा पाटील यांना केवळ १६ मतांवर समाधान मानावे लागले. दुसरीकडे कोणार्क आघाडीच्या विलास पाटील यांनी २५ मते मिळवली.

या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, महापौरपदाच्या उमेदवारीबाबत पक्षात चर्चा सुरू होती. स्नेहा पाटील यांचे नाव निश्चित झाल्यानंतर नारायण चौधरी आणि त्यांच्यासोबत असलेल्या नगरसेवकांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

**(पान २ वर)**

## साखरपुड्यानंतर भावी नवरा-नवरीत होणाऱ्या गप्पांवर बंदी

बालोद : छत्तीसगडमधील सेन समाजाने साखरपुड्यानंतर लग्नापूर्वी तरुण-तरुणींमध्ये होणा-या मोबाइल संवादावर बंदी घालण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. साखरपुड्यानंतर तुटणा-या नात्यांचे प्रमाण वाढत असल्याचे पाहून समाजाने हे पाऊल उचलले आहे. या नव्या नियमांनुसार, आता होणा-या पती-पत्नीला एकमेकांशी फोनवर एकांतात बोलता येणार नाही; अत्यंत आवश्यक असल्यास त्यांना आपल्या पालकांसमोरच संवाद साधावा लागेल.



सेन समाजाचे जिल्हाध्यक्ष संतोष कौशिक आणि प्रदेश संघटन मंत्री गौरी शंकर श्रीवास यांच्या मते, साखरपुड्यानंतर भावी नवरा-नवरी तासनतास फोनवर बोलतात. या संवादादरम्यान अनेकदा वादाचे प्रसंग उद्भवतात किंवा एकमेकांचे विचार न पटल्याने लग्न मोडण्यापर्यंत परिस्थिती जाते. सध्या बालोद जिल्ह्यात लागू असलेला हा नियम लवकरच संपूर्ण प्रदेशात लागू केला. **(पान २ वर)**

## 'रिपाइं'च्या मुंबईतील सर्व तालुका, वॉर्ड समित्या बरखास्त

### केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंचा निर्णय

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आटोपटाचा रिपब्लिकन पक्षाने (आठवले गट) मुंबईतील आपल्या संघटनात्मक रचनेत मोठे फेरबदल करण्याचे संकेत दिले आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार मुंबईतील सर्व तालुका आणि वॉर्ड कमिट्या तातडीने बरखास्त करण्यात आल्या आहेत. येत्या ५ एप्रिलपर्यंत या सर्व स्तरांवर निवडणुका घेऊन नवीन कार्यकारिणी जाहीर करण्याचे आदेश आठवले यांनी दिले



असल्याची माहिती पक्षाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी शुक्रवारी दिली.

आझाद मैदानातील पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत कासारे बोलत होते. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांच्यासह मुंबई प्रदेशातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. मुंबईतील पक्षसंघटनेत नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आणि तरुण रक्ताला संधी देण्यासाठी हा व्यापक निर्णय घेण्यात आल्याचे कासारे यांनी स्पष्ट केले.

पक्षाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील सर्व वॉर्ड आणि तालुका अध्यक्षांची निवड लोकशाही मार्गाने म्हणजेच **(पान २ वर)**

## जिल्हाधिकारी यांनी दिली परीक्षा केंद्रास भेट गुलाबपुष्प देऊन केले विद्यार्थ्यांचे स्वागत

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर: इयत्ता दहावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी श्री केशवराज विद्यालय येथील परीक्षा केंद्राला भेट देऊन पाहणी केली.

तसेच विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती यांच्यासह केंद्र संचालक व अधिकारी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात कॉपीमुक्त परीक्षेसाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. परीक्षा केंद्रावर अचानकपणे भेट देण्यासाठी



भरारी पथकाची व कायमस्वरूपी बैठे पथकाची व्यवस्था करण्यात आली असून, कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक दक्षता घेतली आहे.

जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रावर इयत्ता दहावीची परीक्षा होत असून ३९ हजार २४२ विद्यार्थी ही परीक्षा देत आहेत. प्रत्येक विषयाच्या पेपरसाठी १५२ केंद्रासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग आणि इतर विभागांच्या समन्वयातून १५२ त्रिसदस्यीय बैठी पथके गठीत करण्यात आली आहेत, ती रोटेशन पद्धतीने कार्यान्वित ठेवण्यात येणार आहेत. ही पथके पूर्ण वेळ कार्यरत राहणार आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना **(पान २ वर)**

## डिक्कीतील पैसे चोरीचा बनाव; साडेपाच लाखासह एकास अटक



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर: स्कुटीच्या डिक्कीची बनावट चावी तयार करून, सहकाऱ्याच्या ताब्यातील स्कुटी चोरट्यांनी पळविली असे भासवून बनावट चावीने डिक्कीतील सहा लाख रूपये चोरी झाल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यास बनाव असल्याचे लक्षात आले. पोलिसांनी चोरीचा बनाव करणाऱ्यास रोख रकमेसह अटक केली आहे. स्थागुशाच्या तपास तंत्राचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा उलगडा करून आरोपींना अटक करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला निर्देशित केले. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने लातूर जिल्ह्यात मालमत्तेविषयक गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती संकलित संशयितांचा शोध घेत होते. दरम्यान ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पथकाने पो. स्टे. शिवाजीनगर, लातूर येथे दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी जावेद जलील शेख वय २७, रा. बिलाल मजीद जवळ, इस्लामपुरा, लातूर यास खोरी गल्ली परिसरातून ताब्यात घेतले व पुढील

तपासासाठी विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. तो गेल्या अकरा वर्षांपासून टिळक नगर, लातूर येथील एका डायग्नोस्टिक सेंटर मध्ये एक्स-रे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहे. सदर ठिकाणी ग्राहकांकडून जमा झालेली रक्कम बँकेत जमा करण्यात येत होती. ही रक्कम काही वेळा आरोपी जावेद शेख व त्याचा सहकारी अर्शद शेख यांच्या ताब्यात दिली जात असे. ही बाब जावेद शेख ने त्याचा मित्र आकाश ढगे यास सांगितली. दोघांनी संगनमताने अर्शद शेख यांच्या ॲक्सेस स्कूटरची बनावट चावी तयार करून स्कूटरच्या डिक्कीत ठेवलेली रक्कम चोरी करण्याचा कट रचला. महिनाभरापूर्वी बनावट चावी तयार करून ती जावेद शेख ने आकाश ढगे याच्याकडे दिली. ५ फेब्रुवारी रोजी संबंधित डायग्नोस्टिक सेंटर ने जावेद शेख याच्याकडे ९०,०००/- रुपये व अर्शद शेख याच्याकडे ६,००,०००/- **(पान २ वर)**

## श्री सिध्देश्वर मंदिरात होणार संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांचे पुजन

### मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने होणार पुष्पवृष्टी

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/प्रतिनिधी : श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज शष्ट्शतकोत्तर अमृत महोत्सवी संजिवनी समाधी सांगता, श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सव सांगता सोहळा आणि जगद्गुरु तुकाराम महाराज त्रिशकतोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सांगता सोहळा अशा त्रिवेणी संगमाचे औचित्य साधून लातूर येथे आज शनिवार दि. २१ रोजी संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या पादुकांचे आगमन होणार आहे. सकाळी ९ वाजता सिध्देश्वर मंदीरात या पादूका येणार असून यावेळी हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत पादुकांचे पुजन होणार आहे. याप्रसंगी मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी होणार असून या सोहळ्यास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर यांनी केले आहे.

श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज शष्ट्शतकोत्तर अमृत महोत्सवी संजिवनी समाधी सांगता, श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सव सांगता सोहळा आणि जगद्गुरु तुकाराम म हाराज त्रिशकतोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सांगता सोहळ्यानिमित्त लातूरात वारकत्तयांचा मेळा भरणार आहे. या निमित्ताने संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या पादुकांचे आगमन शनिवार दि. **(पान २ वर)**

### गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन



श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर यात्रा महोत्सवाच्या वतीने मंदीर परिसरात किर्तन व भजन संध्येचा कार्यक्रम दररोज संपन्न होत आहे. या कार्यक्रमांतर्गत आज शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान औसा येथील ह.भ.प. गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या चक्रीभजनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुबाबा महाराज यांचे चक्रीभजन केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आंध्रप्रदेश व कर्नाटकातही प्रसिध्द आहे. या भजन सोहळ्यात भाविक भक्त तल्लीन झाल्याचे पहावयास मिळातात. सिध्देश्वर मंदीरात होणात्तया या चक्रीभजनास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थत्तान प्रशासक जांबुतकर यांच्यासह विश्वस्तांनी केले आहे.

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची पुण्यतिथी आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!



# शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

लातूर: रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थाध्यक्ष डॉ.एम. आर. पाटील सर व उपाध्यक्ष श्री एल.एम. पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शाळेचे प्राचार्य श्री एल. टी. पुरी सर यांच्या नियोजनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे, पोवाडे व पाळणा गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य श्री लक्ष्मण पुरी सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती शौर्य आणि स्वाभिमानाची भावना जागृत झाली.

कार्यक्रमास माध्यमिक,प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयीका मानसी पाटील, अश्विनी पवारव वर्षा कांबळे , श्री.रोहित जाधव व मीनाक्षी सूर्यवंशी, तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी शिवरायांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला. अशा प्रकारे शिवजयंती उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार समन्वयिका अश्विनी पवार यांनी केले.

# माऊली विद्या भवन व शिशुविहार चे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

लातूर, येथील बोधे नगर भागातील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली विद्या भवन व शिशुविहार विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात लातूर येथील मधुमीरा फंक्शन हॉल या ठिकाणी संपन्न झाले.




स्नेहसंमेलनाचे उद्घाटक मा.श्री उमेश गिरवलकर हे होते तर प्रमुख पाहुणे मा.श्री ऋषिकेश पाटील व संस्थेचे कोषाध्यक्ष तानाजी बेवनाळे पाटील हे होते. या स्नेहसंमेलनास नवनीत प्रकाशनचे संचालक मा.श्री.अनिल सूर्यवंशी , अंकुर बालविकास केंद्राचे संचालक मा.श्री.व्यंकटराव दापेगावकर , मा.श्री.विशाल पाटील, प्राचार्या सौ.कविता आरडले, उपप्राचार्या सौ.काळे भाग्यश्री , यांची प्रमुख उपस्थिती होती. स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव श्री गंगाधर आरडले यांनी केले, तर अहवाल सादरीकरण व आभार मुख्याध्यापक श्री.प्रकाश राठोड यांनी केले. या स्नेहसंमेलनात उद्घाटक व मान्यवरांनी उपस्थितांना उपयुक्त असे मार्गदर्शन केले. यावर्षीच्या स्नेहसंमेलनात, शिवतांडव नृत्य, महाराष्ट्रातील संस्कृतीचे दर्शन घडविणारे पारंपरिक नृत्य, गरबा नृत्य, तसेच ऑपरेशन सिंदूर अशा विविध उत्कृष्ट नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन प्राजक्ता चेगे मँडम, व बेलूरे मँडम यांनी केले. या स्नेहसंमेलनाला परिसरातील नागरिक पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक श्री .गोपाळ करडिले ,संपूर्ण शिक्षक वृंद व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

# अभ्यासपूर्वक गुंतवणूक केल्यास फायदेशीर : डॉ. रूपा गिल्डा

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शेअर बाजार गुंतवणुकीवर कार्यशाळा

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बँकिंग अँड इन्शुरन्स समितीच्या वतीने स्टॉक मार्केट बेसिक्स टू लाईव्ह ट्रेडिंग : अ हँड्स-ऑन वर्कशॉप या विषयावर बुधवारी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने होते.




साधन व्यक्ती म्हणून डॉ. रूपा गिल्डा यांनी विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील गुंतवणुकीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बँकिंग अँड इन्शुरन्स समितीचे समन्वयक डॉ. निखिल व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. गिल्डा यांनी सांगितले की, अभ्यासपूर्वक आणि संयमाने गुंतवणूक केल्यास शेअर बाजार अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित क्षेत्राचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचा विविध कंपन्यांवर होणारा परिणाम समजून घेणे गरजेचे असून, कंपन्यांचे ताळेबंद आणि आर्थिक अहवाल तंत्रशुद्ध पद्धतीने अभ्यासणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्यक्ष व्यवहार (लाईव्ह ट्रेडिंग) करताना जोखीम व्यवस्थापनाचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शंका उपस्थित केल्या. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील मूलभूत संकल्पना आणि प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान मिळाले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. निखिल व्यास, डॉ. लता जाधव, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी तसेच प्रशासकीय कर्मचारी राजकुमार माने यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून

### एआय...

यामुळे भारताने याबाबत फार पूर्वीच विचार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या इंडिया एआय मिशनमध्ये कृषी क्षेत्राचा प्रामुख्याने विचार केला आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर , सेवापुरवठा, समावेशकता यांचा विचार केला गेला आहे. श्री. फडणवीस यांनी सांगितले की, भारतातील सुमारे निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. पण यापैकी फार कमी लोकांना बदलते हवामान, शेतीसाठी आवश्यक असणारे निविष्ठाचे दर, शेतमालाचे बाजारभाव, वित्तपुरवठा याबाबत माहिती उपलब्ध आहे. सध्याच्या व्यवस्थेला गतीने माहिती पुरवण्यात आणि आवश्यक माहिती देण्यात काही मर्यादा आहेत. यावर आर्टीफिशीअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने मात करू शकतो. आर्टीफिशीअल इंटेलिजन्स शेतीसाठी आवश्यक असणारी बँकवर्ड आणि फॉरवर्ड लिंकेजची माहिती देऊ शकते. यामध्ये वातावरणातील बदल, जलसिंचन, खतपुरवठा, बाजारभावातील फेरबदल आणि पुरवठा साखळी याबाबत माहिती देऊ शकते. आर्टीफिशीअल इंटेलिजन्स जादूची कांडी नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी एआय माडेल विश्वासार्ह डेटा, सुशासन आणि लोकांशी असलेले उत्तरदायित्व यावर आधारित असायला हवे. विश्वासाशिवाय शेतीशी निगडीत विविध सेवा आपण देऊ शकणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शेतीतील आर्टीफिशीअल इंटेलिजन्सचा वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादीत न राहता ती लाखो लोकांपर्यंत पोहोचायला हवे, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासनाने महाग्री एआय धोरण स्वीकारले आहे. हे धोरण सर्वांसाठी खुले आणि परस्पर समन्वय साधणारे आहे. या धोरणावर आधारित विकसित केलेला मोबाईल प्लँटफॉर्म बहुभाषांमध्ये वैयक्तिक सल्ला देतो, बाजारपेठेतील घडामोडींची माहिती देतो, वातावरणातील बदलाबाबत सूचना देतो आणि अनेक शासकीय योजनांबाबत सल्ला देतो. या सेवेला शेतकऱ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे, ही बाब शेतकरी आर्टिफिशीअल इंटेलिजन्ससाठी सज्ज आहेत, स्पष्ट करते. आर्टीफिशीअल इंटेलिजन्सवर आधारित टेस्ट, इंटीग्रेशन आणि क्रॉप सँप विकसित करणे आमचे ध्येय आहे. शेतीशी निगडीत सर्व डेटाचे एकत्रीकरण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या डेटाच्या आधारे शेती आणि शेतकऱ्यांचा विकासासाठी काम झाले पाहिजे.

श्री. देवेश चतुर्वेदी यांनी महाराष्ट्राचे या एआय क्षेत्रातील योगदानासाठी आणि टेक्नॉलॉजीच्या वापरासाठी कौतुक केले. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा या क्षेत्रासाठीचा पुढाकार आणि विशेषतः कृषि विभागाने राबविलेल्या फार्मर आयडी आणि डीजिटल क्रॉप सर्व्हे साठी त्यांनी प्रशंसोद्गार काढले. ते म्हणाले की, महाराष्ट्राने भारत विस्तारमध्ये आपले असे महाविस्तार प्लॅटफॉर्मद्वारे एआय आधारित सेवा देण्यास प्रारंभ केला आहे. भारत विस्तारमध्ये शेतकऱ्यांना हवामान, बियाणांपासून, पिकांची काळजी, खते, सिंचन ते बाजारपेठेची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे. आता इंग्रजी आणि हिंदी भाषेत पण पुढे जाऊन सर्व भाषांमधून मार्गदर्शन, माहिती उपलब्ध करून दिली जाणार.

श्रीमती सौम्या स्वामिनाथन यांनी तंत्रज्ञानाच्या वापराबाबत सजगता यावी यावर भर दिला. तंत्रज्ञानाच्या अंगाने, कृषि क्षेत्रातील बदलाच्या परिस्थितीत स्त्रियांचे स्थान महत्वाचे आहे. त्यांचा विसर पडता कामा नये याचा उल्लेख करून स्वामिनाथन म्हणाल्या की, तंत्रज्ञान हे चांगले किंवा वाईट नसते. ते कसे वापरले जाते, यावर त्याचे यश अवलंबून असते. डॉ. स्वामिनाथन यांनीही याच गोष्टीवर भर दिला होता. ते म्हणत असत की हरित क्रांती ही केवळ बियाण्याच्या संदर्भात नाही. उत्पादनासाठी बियाणे महत्वाचे आहेतच. पण ही क्रांती ही संपूर्ण अशा इकोसिस्टिम्स आणि त्याअंतर्गत काम करणाऱ्या संस्थांशीही निगडीत असते. यात कृषि विज्ञान केंद्रांपासून ते सिंचन, खते आणि शिक्षण-प्रशिक्षण आणि शेतकऱ्यांपर्यंतच्या सर्व घटकांचा समावेश होता. अंतिमतः शेतकऱ्यांनी या सगळ्या गोष्टींचा स्वीकार केल्यानेच यश मिळाले. यामुळेच या क्षेत्रातील बदलात महिला शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आपल्याकडे महिला शेतकरी या त्याअर्थाने अल्पसंख्य आहेत. कारण त्यांच्या नावावर जमीनीची नोंद आजही खूप कमी प्रमाणात आहे. अलिकडे ही परिस्थिती सुधारते आहे. म्हणूनच या तंत्रज्ञानाच्या सुरवातीच्या टप्प्यातच महिलांबाबतच्या माहितीचा कसा योग्यरित्या केला जाणे महत्वाचे आहे. कृषि सचिव विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले. तसेच महाराष्ट्र शासन कृषि विभागात राबवित असलेल्या डिजिटल तसेच एआय संबंधित विविध प्रकल्पांची त्यांनी माहिती दिली.

### 'बोर्ड ऑफ...

या बैठकीत ४० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले; मात्र फ्रान्स, ब्रिटन, रशिया आणि चीन यांसह संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे प्रमुख सदस्य अनुपस्थित होते. वृत्तानुसार, युरोपियन युनियनने या बोर्डात स्थान न घेण्याचा निर्णय घेतला आहे.

माध्यमांच्या वृत्तानुसार, भारताने गुरुवारी (१९ फेब्रुवारी) ट्रम्प यांच्या 'बोर्ड ऑफ पीस'च्या उद्घाटन बैठकीत 'निरीक्षक देश' म्हणून सहभाग घेतला. गाझामधील युद्धविरामाचे निरीक्षण आणि हमास-इस्रायल संघर्षानंतर उद्ध्वस्त झालेल्या गाझा पट्टीच्या पुनर्बांधणीसाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

भारत सध्या या बोर्डाचा सदस्य नसला तरी निरीक्षक म्हणून बैठकीत सहभागी झाला. वृत्तानुसार, वॉशिंग्टन डीसी येथील भारतीय दूतावासाचे उपराजदूत नामग्या खम्पा यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले.

ट्रम्प यांनी सप्टेंबरमध्ये अमेरिकेच्या मध्यस्थीने जाहीर केलेल्या २० सूत्री गाझा युद्धविराम योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत या शांती बोर्डाचा प्रस्ताव मांडला होता. या बोर्डाच्या प्रारंभीच्या कार्यकारी सदस्यांमध्ये जेरेड कुश्नर, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो, विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांचा समावेश आहे.

### भिवंडी ...

बंडखोरी केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांना दिला होता. त्यांनी बंडखोरी करणार नाही असे आश्वासन दिले होते, मात्र निकालातून त्यांनी बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

पक्षांतर्गत कारवाईचा बडगा

महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी थेट वैचारिक प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेसशी हातमिळवणी केल्याने भाजप नेतृत्वाने हे प्रकरण गंभीरपणे घेतले आहे. ज्यांनी-ज्यांनी पक्षाच्या ध्येयधोरणांविरुद्ध जाऊन आणि आदेश धाब्यावर बसवून काम केले आहे, त्या सर्वांवर पक्ष नियमानुसार कडक कारवाई करेल, असा इशारा चव्हाण यांनी यावेळी दिला.

### साखरपुड्यानंतर...

जाण्याची शक्यता आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीने अन्य धर्म स्वीकारल्यास त्याच्याशी रोटी-बेटीचे संबंध तोडले जातील, असा इशाराही सेन समाजाकडून नव्या फतव्यात देण्यात आला आहे. अनेकांना असे वाटते की लग्न ठरले वा साखरपुडा झाला म्हणजे सर्व मार्ग बंद झाले.

जर हे लग्न मोडले तर सगळीकडे नाचक्की होईल. पण लग्न हे आपण समाजासाठी नाही तर स्वत:साठी करतो. उद्या भविष्य खराब झाल्यावर सुद्धा समाजात आणि लोकांमध्ये नाचक्की होणारच की..! त्यामुळे जर भविष्याची खात्री नसेल आणि मनापासून या नात्यात पुढे जाण्याची इच्छा नसेल तर वेळीच निर्णय घ्यावा. कधीच मार्ग संपत नसतो. तुम्ही जो निर्णय घ्याल त्यानुसार नवीन मार्ग सुरु होत असतो. ती एक नवीन सुरुवात असते. त्यामुळे माणसाने नेहमीच आपल्या भविष्याचा विचार करून निर्णय घ्यावेत.

बूट लपवण्याच्या प्रथेलाही फाटा

मोबाइलच नव्हे, तर लग्नात मेहुणीद्वारे नव-या मुलाचे बूट लपवण्याची प्रथा आता बंद करण्यात आली आहे. कारण यामुळे दोन्ही पक्षांत वादाची स्थिती निर्माण होते. साखरपुड्याच्या कार्यक्रमात केवळ १५ ते २० लोकांनाच नेण्याची परवानगी असेल.

नव्या पिढीमध्ये मतमतांतरे

समाजातील काहींनी या निर्णयाचे स्वागत केले असले तरी, काही तरुणांनी याला वैयक्तिक स्वातंर्त्यावर गदा असल्याचे म्हटले आहे. आयुष्यभर सोबत राहणा-या जोडीदाराला समजून घेण्यासाठी संवाद आवश्यक आहे, असे मत या गटाने मांडले आहे.

### 'रिपाइं'च्या...

निवडणुकांद्वारे केली जाणार आहे. त्यासाठी येत्या २५ फेब्रुवारीपासून संपूर्ण मुंबईत विशेष पक्षसदस्य नोंदणी मोहीम राबवण्यात येईल. या मोहिमेत नोंदणी केलेल्या क्रियाशील सदस्यांनाच वॉर्ड आणि तालुका कमिटीच्या निवडणुकीत सहभागी होता येणार आहे. ५ एप्रिल ही या प्रक्रियेची अंतिम मुदत ठरवण्यात आली आहे.

### जिल्हाधिकारी...

यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेली महसूल अधिकारी, जिल्ह्यातील सर्व खातेप्रमुख यांची ७० भरारी पथके परीक्षा कालावधीत विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेट देवून पाहणी करणार आहेत. परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आलेले आहेत.

### डिक्कीतील पैसे...

रुपये बँकेत भरण्यासाठी दिले. दोघांनी संबंधित रक्कम आपल्या-आपल्या स्कूटरच्या डिक्कीत ठेवली. त्यानंतर एका चहाच्या स्टॉलसमोर गाड्या उभ्या करून चहा पिण्यासाठी थांबले असता जावेद शेखने आकाश ढगे फोनवर माहिती दिली काही वेळाने अर्शद शेख यांची स्कूटर तेथून गायब झाली. नंतर ती स्कूटर हायटेक सेंटर समोरील बोळात आढळून आली; मात्र डिक्कीतील ६,००,०००/- रुपये रोख रक्कम गायब असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी दि. ८ फेब्रुवारी रोजी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे तक्रार दाखल करण्यात आली.

तपासादरम्यान आरोपी जावेद जलील शेख व त्याचा साथीदार आकाश ढगे यांनी संगनमताने बनावट चावी तयार करून चोरीचा बनाव रचून सदर ६,००,०००/- रुपये अपहार केल्याचे निष्पन्न झाले. निष्पन्न आरोपी जावेद जलील शेख यास पुढील तपास कमी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे हजर करण्यात आले होते परंतु चोरीची रक्कम फरार आरोपी

आकाश ढगे यांच्या ताब्यात असल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोध मोहीम राबवून मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मौजे जोडजवळा, ता. जि. लातूर येथे सापळा रचून आरोपी आकाश प्रकाश ढगे वय ३०, रा. जोडजवळा, ता. जि. लातूर, सध्या रा. लेबर कॉलनी, लातूर यास ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपीने त्याचा साथीदार जावेद जलील शेख याच्यासह मिळून चोरी केल्याची कबुली दिली. चोरीतील ६ लाख रुपयांपैकी ५० हजार रुपये खर्च के ल्याचे सांगितले असून उर्वरित ५,५०,०००/- रुपये आरोपीने जोडजवळा येथील भावाच्या घरात लपवून ठेवल्याचे निष्पन्न झाले. यावरून ५,५०,०००/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. पुढील तपास पोलीस स्टेशन शिवाजीनगर, पोलीस करत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, राजेश घाडगे, सफौ सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी, राजेश कंचे, मोहन सुरवसे, अर्जुन राजपूत, प्रदीप स्वामी, जमीर शेख, सुरेखा मदने, श्रीनिवास जांभळे, राहुल कांबळे यांनी केली आहे.

### श्री सिध्देश्वर...

२१ फेब्रुवारी रोजी हेलिकॉप्टरने होणार आहे. सर्वप्रथम या पादुका लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर मंदिरात सकाळी ९ वाजता येणार आहेत. यानिमित्ताने या पादुकांचे पुजन देवस्थानच्या वतीने करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी लातूर जिल्ह्यासह राज्यभरातील विविध साधु, संत व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी ह.भ.प. छोटे कदम माऊली, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, जिल्हा पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांच्यासह मंदीराचे विश्वस्त यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पादुकांचे पुजन होत असताना मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी होणार आहे. या सोहळ्या निमित्ताने देवस्थानच्या वतीने पुजन सोहळ्यासाठी उपस्थित असणाक्त्या वारकक्त्यांसह भाविक भक्तांना अल्पोपहाराची सोय करण्यात आली आहे.

या सोहळ्यात लातूर शहरासह परिसरातील भाविक भक्तांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, नरेश पंड्या, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, मन्मथप्पा लोखंडे, अशोक भोसले, बाबासाहेब कोरे, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन, चंद्रकांत परदेशी, व्यंकटेश हालिंगे यांनी केले आहे.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# जवळा येथे विश्वशांती बुद्ध विहारामध्ये शिवजयंती साजरी



नांदेड प्रतिनिधी: नांदेड दक्षिण मधील तसेच लोहा तालुक्यातील सोनखेड सर्कल अंतर्गत येत असलेल्या, विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी ३९६ वी शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संरक्षण सचिव तथा आकाशवाणी प्रासंगिक निवेदक आनंद गोडबोले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा अध्यक्ष सुरेश गोडबोले, मा. सरपंच साहेब शिखरे, मा. सरपंच माधव पावडे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश शिखरे, मा. ग्रा. प. सदस्य बापूराव पाटील गवळी, शिवसेना सर्कल प्रमुख नामदेव शिखरे, रमाई जयंती मंडळाच्या अध्यक्षा भारतबाई निखाते, तंटामुक्ती अध्यक्ष मिलिंद गोडबोले, आरपीआय कार्यकर्ते धनराज गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम महाकारूणी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रति रूपा समोर व बहुजन प्रतिपालक जाणते राजे डॉ. बाबासाहेबांच्या गुरूंचे गुरु, अर्थात महात्मा ज्योतिबा फुले यांचे गुरु छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय घटनेचे शिल्पकार,बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसमोर दीपा ने धूपाने आणि पुष्पाने पूजा करून, अभिवादन करण्यात आले. विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी सर्व महापुरुषांच्या जयंत्या व स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेऊन, त्यांच्या आयुष्यातील चांगल्या कार्याची माहिती ज्ञान स्मरण करण्यात येते . अशाच पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण क्षणांना या ठिकाणी उजाळा देण्यात आला.

यावेळी गावातील युवा कार्यकर्ते शंकर शिखरे, मदन शिखरे, राजू शिखरे, ज्ञानेश्वर शिखरे, मारुती चक्रधरे, समता सैनिक दलाचे अहेलाजी गोडबोले, शिवाजी शिखरे, नामदेव एकनाथ शिखरे, मनोहर शिखरे, रामप्रसाद शिखरे, किरण शिखरे, मुंजाजी शिखरे, यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक दलाचे जवान, श्रद्धावान बौद्ध उपासक उपासिका, सार्वजनिक भीम जयंती मंडळ, सार्वजनिक शिवजयंती मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, विश्वशांती बुद्ध विहार समिती, त्यागमूर्ती रमाई जयंती मंडळ या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# महिलेच्या अंगावर रॉकेल ओतणाऱ्या आरोपीस जन्मठेप

## सरकार पक्षाकडून १३ साक्षीदारांची साक्ष

धाराशिव (प्रतिनिधी) महिलेच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून देत जिवे मारल्या प्रकरणी आरोपीस जन्मठेप व २५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. धाराशिव येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री डी. देव यांनी हा निकाल सुनावल्याची माहिती अतिरिक्त शासकीय अभियोक्ता सचिन सुर्यवंशी यांनी दिली.

याबाबत सरकारी वकिलांनी दिलेल्या माहितीनुसार, धाराशिव तालुक्यातील जुनोनी येथील दशरथ मुरलिधर सरवदे (वय ३५) हा फिर्यादी निता शशिकांत विधाते (वय ३५, रा. सांजावेस गल्ली धाराशिव) यांच्या घरी भाड्याच्या घरात राहत होता. फिर्यादी यांचे पती १५ ते १६ वर्षापासून सोबत राहत नव्हते. फिर्यादी व आरोपी दशरथ सरवदे यांची ओळख झाल्यानंतर तो फिर्यादीसोबत २-३ महिने व्यवस्थीत राहीला. त्यानंतर आरोपी फिर्यादीस त्रास देवू लागला. २६ मार्च २०१७ रोजी फिर्यादीचा मुलगा सुजित, आरोपी, आरोपीची आई, मावशी व आज्जी हे जेवण करुन रात्री घराच्या गच्चीवर झोपण्यास गेले होते. दरम्यान, आरोपीने फिर्यादीसोबत भांडण केले व त्यानंतर आरोपी व फिर्यादी खाली घरामध्ये आले. तेथेही आरोपीने फिर्यादीसोबत भांडण सुरू केले. यावेळी आरोपीने फिर्यादीच्या अंगावर रॉकेल ओतून काडीने पेटवून दिले. त्यानंतर फिर्यादीचा वाचवा-वाचवा असा आवाज ऐकून फिर्यादीचा मुलगा सुजित त्या ठिकाणी आला.

त्याने त्याच्या आईस अंगावर बकेटने पाणी ओतून विझवत असताना आरोपीची आज्जी, मावशी व आई यांनी सुजित यास आईस विझवू नको तिला मरु दे, असे म्हणून गुन्ह्यास प्रमुख आरोपीस मदत केली. तसेच जखमी फिर्यादीस दवाखान्यात घेवून न जाता सर्वजण घटनास्थळावरुन पळून गेले. त्यानंतर फिर्यादीचा मुलगा सुजित याने जखमी आईस रिक्षात जिल्हा शासकीय रुग्णालय धाराशिव येथे उपचारार्थ दाखल केले. ती शुध्दीवर असताना तिचा मृत्यूपूर्व जबाब वैद्यकीय अधिकारी यांच्या समक्ष पोलिसांमार्फत घेण्यात आला.

त्या अनुषंगाने दशरथ सरवदे, त्याची आई शहाबाई मुरलिधर सरवदे, मावशी प्रमिला, शोभा अनिल घाडगे व आज्जी कस्तुराबाई भाबूराव गायकवाड यांच्या विरुद्ध पोलिस ठाणे धाराशिव शहर येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक संग्राम जाधव यांनी या गुन्ह्याचा तपास करुन सर्व आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री डी. देव यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सरकार पक्षातर्फे एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. तपासादरम्यान फिर्यादी तथा जखमी निता विधाते यांचा उपचारादरम्यान घेतलेल्या जबाबाची तपास अधिकारी जाधव यांनी व्हिडीओ रेकॉर्डींग केले होते. हे रेकॉर्डींग सदर प्रकरणात महत्वाचा पुरावा ठरले. नायब तहसीलदार यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यासमक्ष दुसरा मृत्यूपूर्व जबाब नोंदविला होता. या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मयताचा मुलगा सुजित विधाते, मयताचे दोन लेखी मृत्युपूर्व जबाब, तोंडी, व्हिडीओग्राफी मृत्युपूर्व जबाब हे एकमेकाशी सुसंगत असल्याचे सुनावणीत स्पष्ट झाले.

साक्षपुराव्यानंतर न्यायालयाने आरोपी दशरथ यास जन्मठेप व २५ हजार रुपये द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. इतर तीन महिला आरोपी यांची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. या प्रकरणात अभियोग पक्षाच्यावतीने अतिरिकत्त शासकीय अभियोक्ता सुर्यवंशी यांनी भक्कम बाजू मांडली.

# छत्रपती शिवाजी महाराज एक अतुलनीय व्यक्तिमत्व : प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी

देगलूर (प्रतिनिधी) : कर्तृत्व, शौर्य, साहस, नीती, रयतेचे हित, कल्याणकारी राज्याचे ध्येय, प्रशासन, गुणग्राहकता, दूरदृष्टी, वेळेचे अचूक व शिस्तबद्ध नियोजन, जनहितावर आधारित राजकारण, इत्यादी विविध बाबतीत ज्या व्यक्तिमत्वाशी अन्य कोणत्याही व्यक्तीची तुलना होऊच शकत नाही असे अतुलनीय व्यक्तिमत्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय, असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित शिवजयंती कार्यक्रमात अध्यक्षीय समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, थोर ऐतिहासिक पुरुषांबद्दल एखादे विधान करणे, ते विधान आंगलट येत आहे असे दिसताच मला तसे म्हणावयाचे नव्हते, समोरच्याने वेगळा अर्थ काढला अशी मलमपट्टी करणे, यासारखे वारंवार घडून येणारे प्रकार उद्विग्नता निर्माण करणारे असून ही बाब अतिशय चिंताजनक आहे. छत्रपती शिवाजी महाराज व तत्सम थोर पुरुषांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, त्याचे राजकारण केले जाऊ नये अशी अपेक्षा उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. दिगंबर कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ. भास्कर कोशीडगेवार यांनी मानले.

# ग्रामसेवक दिनेश गडदे यांच्या मनमानी कारभाराला पांघरण कोणाचे बेंबरा ग्रामपंचायत चौकशी प्रकरण

हणेगाव (प्रतिनिधी): देगलूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना प्राथमिक माहिती अहवाल देण्याचे चुकवत परत प्रत्यक्ष चौकशी अधिकारी यांना अपुरे अभिलेख देऊन चौकशी अधिकारी यांना घुमजाव करणारे ग्रामसेवक दिनेश गडदे यांच्या मनमानी कारभाराला पांघरण कोणाचे असा प्रश्न बेंबरा ग्रामपंचायत चौकशी दरम्यान उपस्थित झाले आहे.

तालुक्यातील बेंबरा ग्रामपंचायत गैरव्यवहार प्रकरणी ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर पंचायत समिती देगलूर चे गट विकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी ता.१४ जानेवारी ग्रामसेवक गडदे यांना तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक माहिती अहवाल सादर करण्याचे पत्र दिले होते मात्र ग्रामसेवक यांनी कोणतीच माहिती सादर केले नाहीत यामुळे ता.१८ जानेवारी रोजी चौकशी अधिकारी बी.जी. उमाटे यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष चौकशी करण्यात आले मात्र या चौकशीत सुद्धा ग्रामसेवक गडदे यांनी पाच वर्षाचे अभिलेखे सादर न करता फक्त वर्ष २०२१ - २२ व २२ - २३ या दोन वर्षाचे अभिलेखे सादर केले अपूर्ण अभिलेख मुळे चौकशी अपूर्ण झाले असून पूर्ण अभिलेखे सादर होताच चौकशी करण्यात येणार असल्याचे चौकशी अधिकारी बालाजी उमाटे यांच्या कडून पंचनामा करण्यात आले.

मागील एक महिन्यापासून ग्रामपंचायत गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करण्याचे मागणी करत असताना ग्रामसेवक दिनेश गडदे यांनी अधिकारी व कर्मचारी यांना घुमजाव करत असल्याची चर्चा सर्वत्र होत असून यामुळे वरिष्ठांनी दिलेल्या पत्रात अहवाल सादर करण्यास विलंब झाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील असे नमूद आहे यामुळे संबंधित ग्रामसेवक यांनी एक वेळेस नाही तर दोन वेळेस माहिती अहवाल व अभिलेखे सादर करण्यास विलंब केले असून अशा बेजबाबदार ग्रामसेवक दिनेश गडदे यांच्या विरुद्ध वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार की असेच कागदोपत्री खेळ खेळणार अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये चालू आहे .

# जवळा येथे विश्वशांती बुद्ध विहारामध्ये शिवजयंती साजरी



नांदेड प्रतिनिधी: नांदेड दक्षिण मधील तसेच लोहा तालुक्यातील सोनखेड सर्कल अंतर्गत येत असलेल्या, विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी ३९६ वी शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संरक्षण सचिव तथा आकाशवाणी प्रासंगिक निवेदक आनंद गोडबोले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा अध्यक्ष सुरेश गोडबोले, मा. सरपंच साहेब शिखरे, मा. सरपंच माधव पावडे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश शिखरे, मा. ग्रा. प. सदस्य बापूराव पाटील गवळी, शिवसेना सर्कल प्रमुख नामदेव शिखरे, रमाई जयंती मंडळाच्या अध्यक्षा भारतबाई निखाते, तंटामुक्ती अध्यक्ष मिलिंद गोडबोले, आरपीआय कार्यकर्ते धनराज गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम महाकारूणी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रति रूपा समोर व बहुजन प्रतिपालक जाणते राजे डॉ. बाबासाहेबांच्या गुरूंचे गुरु, अर्थात महात्मा ज्योतिबा फुले यांचे गुरु छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय घटनेचे शिल्पकार,बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसमोर दीपा ने धूपाने आणि पुष्पाने पूजा करून, अभिवादन करण्यात आले. विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी सर्व महापुरुषांच्या जयंत्या व स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेऊन, त्यांच्या आयुष्यातील चांगल्या कार्याची माहिती ज्ञान स्मरण करण्यात येते . अशाच पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण क्षणांना या ठिकाणी उजाळा देण्यात आला.

यावेळी गावातील युवा कार्यकर्ते शंकर शिखरे, मदन शिखरे, राजू शिखरे, ज्ञानेश्वर शिखरे, मारुती चक्रधरे, समता सैनिक दलाचे अहेलाजी गोडबोले, शिवाजी शिखरे, नामदेव एकनाथ शिखरे, मनोहर शिखरे, रामप्रसाद शिखरे, किरण शिखरे, मुंजाजी शिखरे, यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक दलाचे जवान, श्रद्धावान बौद्ध उपासक उपासिका, सार्वजनिक भीम जयंती मंडळ, सार्वजनिक शिवजयंती मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, विश्वशांती बुद्ध विहार समिती, त्यागमूर्ती रमाई जयंती मंडळ या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# ग्रामसेवक दिनेश गडदे यांच्या मनमानी कारभाराला पांघरण कोणाचे बेंबरा ग्रामपंचायत चौकशी प्रकरण



हणेगाव (प्रतिनिधी): देगलूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना प्राथमिक माहिती अहवाल देण्याचे चुकवत परत प्रत्यक्ष चौकशी अधिकारी यांना अपुरे अभिलेख देऊन चौकशी अधिकारी यांना घुमजाव करणारे ग्रामसेवक दिनेश गडदे यांच्या मनमानी कारभाराला पांघरण कोणाचे असा प्रश्न बेंबरा ग्रामपंचायत चौकशी दरम्यान उपस्थित झाले आहे.

तालुक्यातील बेंबरा ग्रामपंचायत गैरव्यवहार प्रकरणी ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर पंचायत समिती देगलूर चे गट विकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी ता.१४ जानेवारी ग्रामसेवक गडदे यांना तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक माहिती अहवाल सादर करण्याचे पत्र दिले होते मात्र ग्रामसेवक यांनी कोणतीच माहिती सादर केले नाहीत यामुळे ता.१८ जानेवारी रोजी चौकशी अधिकारी बी.जी. उमाटे यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष चौकशी करण्यात आले मात्र या चौकशीत सुद्धा ग्रामसेवक गडदे यांनी पाच वर्षाचे अभिलेखे सादर न करता फक्त वर्ष २०२१ - २२ व २२ - २३ या दोन वर्षाचे अभिलेखे सादर केले अपूर्ण अभिलेख मुळे चौकशी अपूर्ण झाले असून पूर्ण अभिलेखे सादर होताच चौकशी करण्यात येणार असल्याचे चौकशी अधिकारी बालाजी उमाटे यांच्या कडून पंचनामा करण्यात आले.

मागील एक महिन्यापासून ग्रामपंचायत गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करण्याचे मागणी करत असताना ग्रामसेवक दिनेश गडदे यांनी अधिकारी व कर्मचारी यांना घुमजाव करत असल्याची चर्चा सर्वत्र होत असून यामुळे वरिष्ठांनी दिलेल्या पत्रात अहवाल सादर करण्यास विलंब झाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील असे नमूद आहे यामुळे संबंधित ग्रामसेवक यांनी एक वेळेस नाही तर दोन वेळेस माहिती अहवाल व अभिलेखे सादर करण्यास विलंब केले असून अशा बेजबाबदार ग्रामसेवक दिनेश गडदे यांच्या विरुद्ध वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार की असेच कागदोपत्री खेळ खेळणार अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये चालू आहे .

# छत्रपती शिवरायांच्या विचारावर विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे वाटचाल करावी: अरूणाताई कांदे



लातूर / प्रतिनिधी- छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. छत्रपती शिवरायांनी वयाच्या १६ व्या वर्षी स्वराज्य स्थापनेची शपथ घेऊन मोजक्या मावळ्यांच्या मदतीने अत्यंत कमी कालावधीत स्वराज्याची निर्मिती केली. त्यांच्या या कार्यातून छत्रपती शिवरायांचे शौर्य, धैर्य आणि स्वराज्य स्थापनेसाठी त्यांनी गणिमीकावा पध्दतीने केलेला संघर्ष आपल्यासमोर उभा राहतो. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांचे विचार आत्मसात करून त्या विचारावर यशस्वीपणे वाटचाल करावी, असे आवाहन स्वामी दयानंद विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अरूणाताई कांदे यांनी केले.

यावेळी त्या जेएसपीएम संचालित स्वामी दयानंद विद्यालय, कव्हा येथे छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी या कार्यक्रमाला बाबा कदम, दिपमाला मस्के, शिवशरण थंबा, श्रीकांत भिसे, आक्कलदिवे, तुरेवाले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना अरूणाताई कांदे म्हणाल्या की, छत्रपती शिवरायांचे जीवन हे केवळ पराक्रमाचे प्रतीक नसून ते धैर्य, न्याय, कर्तव्यनिष्ठा आणि स्वाभिमानाचे जिवंत विद्यापीठ आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून राष्ट्रप्रेम, संघटनशक्ती आणि स्त्री-सन्मान यांसारख्या मूल्यांचा आदर्श घ्यावा. संकटे कितीही मोठी असली तरी चिकाटी, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा यांच्या बळावर यश मिळविता येते, हे शिवरायांनी दाखवून दिले. शिक्षण घेत असताना शिस्त, वेळेचे महत्त्व आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणे हीच खरी शिवभक्ती आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आयुष्यात किमान एक तरी गुण शिवरायांकडून आत्मसात करून तो कृतीत उतरवावा, तेव्हाच जयंती साजरी करण्याचा खरा अर्थ पूर्ण होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेतील शिक्षक शिवशरण थंबा यांनी छत्रपती शिवरायांवरील पोवाड्याचे उत्कृष्ट सादरीकरण केल्यामुळे मुख्याध्यापिका अरूणाताई कांदे यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवनाथ पांचाळ, राजाराम काळे यांच्यासह शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यांची परिश्रम घेतले. यावेळी या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्रशासकीय काळात पालिकेवर २० कोटींचे कर्ज?

## औसा पालिकेचे २ लाख १७ हजार रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक



औसा /प्रतिनिधी-औसा नगर पालिकेच्या चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत मोठ्या व खर्चिक कामांवर वारेमाप खर्च करण्यात आला.तब्बल १० कोटी रुपयांचे दायित्व (देणी) असून,पालिकेवर विविध संस्थांचे कर्ज व देणी मिळून २० कोटी रुपयांचे कर्ज असल्याची माहिती उपनगराध्यक्ष प्रा. डॉ अफसर शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली. पालिकेच्या तिजोरीत खणखणाट आहे.पुढील कालावधी पालिकेसाठी परीक्षेचा काळ ठरणार आहे.

पालिकेत जानेवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२५ या जवळपास ४ वर्षांच्या कार्यकाळात प्रशासकीय राजवट होती.मुख्याधिकारी हे प्रशासक म्हणून संपूर्ण पालिकेचा गाडा हाकत होते.प्रशासकीय राजवटीत अनेक खर्चिक व मोठ्या विकासकामांना मान्यता दिली गेली.पालिकेचा १० टक्के स्वहिस्सा न भरताच कोणत्या आधारावर कोणाच्या तरी सांगण्यावरून अश्या खर्चिक कामांना मंजुरी देण्याचा सपाटा प्रशासनाने लावला असा आरोप त्यांनी यावेळी केला.

पालिकेची आर्थिक स्थितीचा विचार न करता वारेमाप खर्च करण्यात आला.विकासाच्या नावाने कोट्यवधीचा खर्च करून घेण्यात आले.त्यामुळे पालिकेवर जवळपास १० कोटींचे कर्ज आहे.तर तब्बल १० कोटी रुपयांची देणी असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. दरम्यान पालिकेची सोमवारी अंदाजपत्रकीय बैठक संपन्न होऊन त्यात औसा पालिकेने सन २०२६२७ चे २ लाख १७ हजार रुपयांच्या शिलकी अंदाजपत्रकास मंजुरी दिली असल्याचेही माहिती त्यांनी यावेळी दिली.

तब्बल १० कोटी देणे

औसा पालिकेला विविध स्वरूपाची तब्बल १० कोटीची देणी औसा नगर पालिकेला विद्युत बिलाचे ४ कोटी ४० लाख, पाणीपुरवठा कंत्राटदाराचे दुरुस्तीचे ५० लाख,घनकचरा व्यवस्थापनेचे २ कोटी,पाणीपुरवठा कंत्राटी कामगारांचे ११ लाख,कर्ज ३ कोटी असे पालिकेवर १० कोटींचे दायित्व आहे. सलग चार वर्षे प्रशासकीय राजवटीत असताना मोठ्या खर्चाच्या प्रकल्पांना झपाट्याने मंजुरी देण्यात आली. अनेक कामे अद्याप सुरू असून या कामांना कोणाच्या सांगण्यावरून मंजुरी देण्यात आली असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. आमच्या अधिकारावर गदा आणली जात आहे प्रा.डॉ अफसर शेख औसा पालिकेच्या मंजूर विकास कामांचा निधी शुद्धिपत्रक काढत दुसरीकडे वळवून बांधकाम विभागामार्फत ती कामे करण्यात येणार असल्याने आमच्या हक्कावर एकप्रकारे गदा आणली जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले

# फर्टिलायझर्स असोसिएशनतर्फे शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

## खुशी फाऊंडेशनला ३० खुर्च्या, ३० ब्लॅकेट वाटप व अन्नदानासह इतर सामाजिक उपक्रमांतून साजरा झाला शिवजन्मोत्सव सोहळा

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर : फर्टिलायझर्स, पेस्टीसाईडस् अॅण्ड सिड्स डिलर्स असोसिएशन, तालुका लातूरच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा मार्केट यार्डाच्या शिवनेरी गेट परिसरात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खुशी फाऊंडेशन या संस्थेतेला ३० खुर्च्या, ३० ब्लॅकेट वाटप करण्यात आले. तसेच शिवजन्मोत्सवा निमित्त अन्नदान करण्यात आले.



सोहळ्याच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीचे पुजन चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार वैजनाथराव शिंदे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. एस. कदम, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य अश्विनीताई दत्तात्रय शिंदे, पंचायत समितीच्या सदस्या दीपाली अनिल कराड, लातूर जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष् प्रदीप सोनवणे, मोहिम अधिकार मिलींद बिडबाग यांच्यासह संतोष लाळगे, रमेश गुट्टे, चंद्रकांत टिळक, संजय इरकर, मुस्तफा सय्यद, अरविंद पाटील, बालाप्रसाद बिदादा, गीता मद्रेवार , रंजना विठ्ठल तळेकर, भीमाशंकर मद्रेवार , नवनाथ भोसले नेताजी रणखांब कृष्णा खानापुरे कृषी अधिकारी मिलिंद बीडबाग, संतोष लाळगे, गुठे साहेब जय राम भोसले, टिळक साहेब, महादू शिरसाट, वैभव तळेकर, राणा चव्हाण, किशोर शिंदे, , सिद्राम चाकोते, महेश सोनवणे, यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रत्येकांनी वाचावा. शिवरायांच्या इतिहासाचे वाचन घराघरात झाले पाहिजे. जिजाऊंनी शिवरायांचा कसे घडवले, हे वाचने खुप महत्वाचे आहे. जातीभेद न करता सर्वांना सोबत घेऊन शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली. त्याचा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे, असे आवाहन वैशालीताई देशमुख यांनी यावेळी केले.कार्यक्रमा दरम्यान श्रीमती वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते खुशी फाऊंडेशनला ३० खुर्च्या, ३० ब्लॅकेट वाटप करुन नागरिकांना अन्नदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन तालुकाध्यक्ष विठ्ठल तळेकर आणि तालुका सचिव राजकुमार शिंदे, राजेश मद्रेवार, सतिश देशमुख, विजय कदम, आनंद आग्रवाल, केदार सोनाळे, निरज स्वामी, निलेश भुतडा, सिद्राम चाकोते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. सुत्रसंचलन दयानंद कालशेट्टे यांनी केले तर भिमाशंकर मद्रेवार यांनी आभार मानले.

# शास्त्री विद्यालयात शिवजयंती साजरी



**दै. अदिती एक्सप्रेस**
**जयप्रकाश पाटील**

उदगीर: येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शिवजयंती संपन्न झाली.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष कृष्णा मारावार प्रमुख पाहुण्या आशा मोरे पर्यवेक्षक किरण नेमट माधव मठवाले कार्यक्रम प्रमुख विश्वजीत श्रीखंडे उपस्थित होते.

यावेळी कल्याणी महामुनी हीने शिवरायांवर भाषण केले तर प्रमुख पाहुण्या आशा मोरे यांनी आदर्श राज्यकर्ता म ुत्सद्दी व कर्तुत्ववान राजा हे शिवरायांचे गुणवैशिष्ट्ये आपल्या भाषणात विशद केले. अध्यक्ष समारोपात कृष्णा मारावार यांनी शिवरायांच्या विलक्षण व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय शिवशट्टे प्रास्ताविक विश्वजीत श्रीखंडे स्वागत व परिचय मनीषा आचार्य तर आभार मच्छिंद्र सोनकांबळे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता प्रीती शेंडे यांच्या कल्याणमंत्रानी झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे सहप्रमुख निलेश मांडवकर यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# उदयगिरीत बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



**(पाटील जयप्रकाश)**

उदगीर- मराठी पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाणारे बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उपाध्यक्ष अॅड. प्रकाश तोंडारे, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच संस्था सदस्य दिलीप चौधरी, शिवराज वल्लापुरे, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे आणि एस. जी. कोडचे, स्टाफ सेक्रेटरी प्रा. डॉ. ए. पी. मोरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# साकोळ येथील श्रीक्षेत्र मल्लिकार्जुन मंदीरात डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज व आक्कामहादेवींच्या मूर्तीची स्थापना

## स्थापनेच्या पूर्वसंध्येला मुर्तीच्या पालखीची वाजत गाजत मिरवणूक व लक्षदीप सोहळयाने दिप प्रज्वलन..







**दै. अदिती एक्सप्रेस**

शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी– रोजी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथील ग्रामदैवत श्रीक्षेत्र मल्लिकार्जुन देवस्थान मंदीरात गेल्या दोन दिवसांपासून चालत असलेलेल्या विविध कार्यक्रमासह डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज व आक्कामहादेवी यांच्या मुर्तीची स्थापना सद्गुरू सिद्दयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर व शंकरलिंग शिवाचार्य महाराज शिरूर अनंतपाळ यांच्या शुभ हस्ते ता.२० फेब्रुवारी २०२६ रोजी विधीवत पुजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात ता.१९ फेबुरवारीपासुनच करण्यात आली होती.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी दिक्षा समारंभ आटोपून दुपारी ४:०० वाजता ष.ब्र.१००८ सदगुरू सिद्दयाळ शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते भव्य शोभा यात्रामध्ये डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज व आक्कामहादेवी यांच्या मुर्तीची व शिवाचार्यांची रथातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुसाठी साकोळ व पंचक्रोशीतील हजारो महिला भक्तांनी मिरवणुकीत भाग घेऊन मिरवणुकीची शोभा वाढवली तसेच सदरील महिला भजनी मंडळाकडून मिरवणुकीत रिंगण सोहळा आयोजित करून त्यामध्ये माऊलीचा एक गजर गुरूराज माऊली असा गजर चालु होता .

मिरवणुकीत महिलांनी भजनाचे अनेकानेक प्रकार त्यामध्ये पाऊल, फुगडी, विविध भारूडे, सादर करण्यात आले तर हजारो महिलांनी फेटा बांधल्यामुळे मिरवणुकीला वेगळेच आकर्षण निर्माण झालेले होते.

मिरवणुकीची सुरूवात छत्रपती शिवाजीमहाराज चौकात सुरूवात होऊन ती लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक मार्गे जगत ज्योती महात्मा बस्वेश्वर चौकातुन श्रीक्षेत्र मल्लिकार्जुन देवस्थान मंदीरात जाऊन त्या ठिकाणी लाखो दीप प्रज्वलन प्रज्वलित करण्यात आल्या.

तर ता.२० फेब्रुवारी २०२६ रोजी सदगुरू सिद्दयाळ शिवाचार्य महाराज व शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज व आक्कामहादेवी यांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यांसाठी बर्गे , होनमाळे, डोंगरे,कोमारे,धुमाळे, महाजन, लुल्ले, पाटील तसेच मंदीर कमिटीकडून मोलाचे सहकार्य लाभले.

**मंदीर कमिटीच्या आक्कामहादेवी भजनी मंडळाकडून पालखी मिरवणूकीचे नियोजन केल्यामुळे मिरवणुकीत फक्त महिला भजनी मंडळ व मिरवणूक प्रमुख असल्यामुळे मिरवणूकीला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. मिरवणुकीत पारंपारिक वाद्य, टाळ, मृदंग, तबला, आणि भगवे पताक्यांनी साकोळकराचे मन जिंकून घेतले होते.**

**पालखी मिरवणूक सोहळ्यात महिलांची लाक्षणिक उपस्थिती. साकोळ व परिसरातील भाविक भक्तांनी पालखी सोहळ्यात न भुतो ना भविष्यती असा जनसमुदाय उसळल्यामुळे साकोळला महायत्रेचे स्वरूप निर्माण झालेले होते.**

# जि प सदस्य धर्मपाल देवशेट्टे यांचा साकोळ नगरीत जाहीर सत्कार

**दै. अदिती एक्सप्रेस**



शिरूर अनंतपाळ /प्रतिनिधी– ता.२०.रोजी बातमीदार शिरूर आनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथे नुकत्याच झालेल्या लातूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये विजय झाल्याबद्दल धर्मपाल देवशेट्टे यांचा साकोळ नगरीत जाहीर सत्कार करण्यात आला.

धर्मापाल देवशेट्टे यांनी जळकोट तालुक्यातील वांजरवाडा गटातून लातूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवार म्हणून विजयी झाल्याबद्दल साकोळ ग्रामस्थांच्या वतीने त्यांच्या जाहीर सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने आज ता.२० फेब्रुवारी रोजी साकोळ येथील जगत ज्योती महात्मा बसवेश्वर चौक येथे साकोळ ग्रामस्थांच्यावतीने प्रभारी सरपंच राजकुमार पाटील व मुनाळे परिवार यांच्या वतीने त्यांचा सपत्नीक जाहीर सत्कार करण्यात आला.त्यानंतर शिरूर अनंतपाळ तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने तालुकाध्यक्ष सतीश मल्लाडे व संजीव कांबळे यांच्या शुभहस्ते ही त्यांचा येतोच सत्कार व सन्मान करून ग्रामस्थांसमवेत त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी प्रभारी सरपंच राजकुमार पाटील,माजी चेअरमन सूर्यकांत उमाटे, प्रमोद हुडगे,सामाजिक कार्यकर्ते शिवा डोंगरे,विनायक मुनाळे,बाबुराव मुनाळे,चंद्रकांत मुनाळे,उमाकांत मुनाळे,गुरुनाथ मुळजे,काशिनाथ कडेकर,भाऊराव शिंदे बालाजी डोंगरे, कमलाकर बिरादार,शिवहार भिक्का,सचिन माळी,मुन्ना भालके,शेषराव होनमाळे,विशाल साकोळे,विजयकुमार कांबळे यांच्यासमवेत ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुन्हेगारांची गय नको; अवैध मद्यविक्री, अंमली पदार्थ विक्री रोखा - पालकमंत्री

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर, दि. २० : जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावीत. सराईत गुन्हेगार, तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तींवर कठोर कार्यवाही करावी. शहरातील ट्युशन एरियासह शाळा, महाविद्यालय परिसरात विनाकारण फिरणाऱ्या, दहशत म ाजविणाऱ्यांविरुद्ध आवश्यक कार्यवाही हाती घेण्याच्या सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज दिल्या.



लातूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

पोलिसांनी शहरातील विविध भागात अचानक कॉम्बिंग ऑपरेशन राबवून अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींवर, सराईत गुन्हेगारांवर कारवाई करावी. विशेषतः शहरातील वसतिगृहे, ट्युशन एरियासह इतर भागात सातत्याने पोलिस गस्त सुरू करावी. जिल्ह्यातील अवैध दारू विक्रीला पायबंद करण्यासाठी पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त मोहीम हाती घ्यावी. अंमली पदार्थ, नशा करण्यासाठी वापरली जाणारी औषधे याची जिल्ह्यात विक्री होणार नाही, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तातडीने मोहीम हाती घ्यावी. ज्या परिसरात अवैध दारू, अंमली पदार्थ विक्री होत असल्याचे निदर्शनास येईल, त्या क्षेत्राच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले.

गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांवर तडीपारीची कार्यवाही करावी. कोणत्याही गुन्हेगाराची गय न करता जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. बेकायदेशीरपणे शस्त्रास्त्रे बाळगणाऱ्या, अशी शस्त्रास्त्रे विक्री करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या. तसेच युवक, म हाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चुकीच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठी जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रम ेश कराड यांनीही यावेळी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना दिल्या.

जिल्ह्यात एमपीडीए अंतर्गत कार्यवाही जलद गतीने करण्यात येत आहे. तसेच शाळा, महाविद्यालयातील प्राचार्य, हॉस्टेल चालक यांच्या मदतीने शहरात लवकरच विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी मोहीम राबविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

# बिटरगावात एनएसएस विशेष शिबिराचा उत्साहपूर्ण प्रारंभ

**दै. अदिती एक्सप्रेस**

बिटरगाव : येथे स्वामी विवेकानंद महाविद्यालय, लातूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आयोजित विशेष शिबिराचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बिटरगावचे सरपंच महेंद्र पाटील, चेअरमन आप्पासाहेब पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. बोंडगे, डॉ. आर. आर. चव्हाण (अध्यक्ष, ऋचा फाउंडेशन) तर अध्यक्षस्थानी सूर्यकांत चव्हाण (मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय बिटरगाव) उपस्थित होते. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन या विषयावर डॉ. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले, तर प्रा. आशा डांगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.




अध्यक्षीय भाषणात श्री. चव्हाण यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ शिबिरापुरती मर्यादित नसून सेवा, संस्कार आणि समाजजागृतीचा संस्कारवृक्ष असल्याचे प्रतिपादन केले. ङ्गछेीं चश, ईीं धेींङ्ग हा एनएसएसचा मूलमंत्र विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक बांधिलकीची ज्योत प्रज्वलित करतो, असे ते म्हणाले. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून समाजाशी नाते जोडणारे आणि जबाबदारीची जाणीव करून देणारे असावे, असेही त्यांनी नमूद केले.

महाविद्यालयाचे नाव ज्यांच्या प्रेरणेतून घेतले आहे त्या स्वामी विवेकानंद यांच्या ङ्गउठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नकाङ्ग या संदेशाचा उल्लेख करून युवकांनी समाजपरिवर्तनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी श्रमसंस्कार, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता आणि आरोग्य जनजागृती आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. या उपक्रमांमुळे गाव आणि महाविद्यालय यांच्यातील नाते अधिक दृढ होत असून युवकांच्या सहभागातून ग्रामविकासाला नवी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास प्रा. आशा डांगे, प्रा. सुदर्शना चव्हाण, प्रा. रचना अग्रवाल, प्रा. सबिया कादरी, प्रा. प्रियंका शिंदे, एनएसएस विभागाचे कार्यक्रम अधिकारी, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामुळे बिटरगावात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून सेवाभाव, शिस्त आणि टीमवर्कचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये दृढ होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेणूनाथ यादव यांनी केले, तर आभार प्राचार्य शिवराज बोडगे यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.